# भालचंद्र नेमाडे जगात कुठेही आणि कधीही !

**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ साहित्य प्रा. भालचंद्र नेमाडे यांच्या सर्व साहित्याच्या ई-बुक प्रकाशनाचा कार्यक्रम रविवारी सायंकाळी पु.ल.अकादमी, रवींद्र नाट्य मंदिर येथे पार पडला. मराठी साहित्य जगभर कुठेही आणि केव्हाही उपलब्ध होण्यासाठी साकारण्यात आलेल्या 'बुकगंगा' या आधुनिक ऑनलाईन सुविधेचे निर्माते मंदार जोगळेकर यांनी आता नेमाडे यांचे सर्व साहित्य जगभरातील वाचकांसाठी ऑनलाईन आणले आहे.

वाचनसंस्कृतीचा ऱ्हास होत असल्याची ओरड होत आहे, पण बदलत्या परिस्थितीचा विचार करून वाचकाला पुस्तक त्याच्या सोयीनुसार उपलब्ध करून दिल्यास त्याला ते वाचायला हवं असतं हे आपण लक्षात घ्यायला हवं. त्यातून आधुनिक काळाला साजेशी अशी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्याचा ध्यास आपण घेतला आहे, असं सध्या अमेरिकेत राहणारे मंदार जोगळेकर यांनी या कार्यक्रमात सांगितलं.



आयपॅडवर एकाच ठिकाणी मराठीतील सर्व लेखकांची, प्रकाशकांची पुस्तकं उपलब्ध व्हावीत, हाच 'बुकगंगा डॉट कॉम'चा उद्देश आहे. यामुळे अख्खं वाचनालयचं तुमच्या हातात उपलब्ध असतं. तुम्हाला वाचनालयात जाण्याची गरज पडत नाही, तर वाचनालयच तुमच्याकडे आलेलं असतं. त्यामुळे तुमच्या सोयीनुसार तुम्ही कुठलंही पुस्तक वाचू शकता, असं जोगळेकर म्हणाले.

नेमाडे यांची कोसला ही कादंबरी ३७ वर्षांनंतर पुन्हा वाचावीशी वाटणं हेच त्यांचं कादंबरीकार म्हणून यश आहे. नेमाडे यांच्या साहित्याचं सातत्यानं मूल्यमापन होत राहिलं पाहिजे. त्यांना मिथ केलंत तर त्यांच्या साहित्याचं मूल्य संपलेलं असेल. देशीवादाचा आग्रह धरताना नेमाडे यांनी जात या घटकला महत्त्व दिलं आहे, हे कोडं काही आपल्याला सुटत नाही, असं मत कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यसभा सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केलं. व्यासपीठावर ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ, ग्रंथालीचे दिनकर गांगल उपस्थित होते. यावेळी साहित्याचे अभ्यासक शशीकांत सावंत यांनी भालचंद्र नेमाडे यांची मुलाखत घेतली. त्यातून त्यांच्या स्वभाव आणि साहित्याच्या विविध पैलूंचे उपस्थितांना दर्शन घडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुराधा परब यांनी केलं.